# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:03.06.2026** **वार:बुधवार**

---

1. विवाहित मुलींना अनुकंपा नियुक्तीतून वगळता येणार नाही-सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय
2. घाऊक किंमत निर्देशांक टप्प्याटप्प्यानं बंद करण्यात येणार.
3. डीआरडीओकडून रुद्र एम-टू या हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी.
4. नेपाळसोबत सीमा प्रश्नांच्या निराकरणाबाबतीत त्रयस्थ पक्षाचा हस्तक्षेप भारतानं फेटाळला. आणि
5. वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत इंग्लंडचा भारतावर 2-1 असा विजय

**अनुकंपा**

विवाहित मुलींना अनुकंपा नियुक्तीतून वगळता येणार नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं काल दिला. कुटुंबाच्या व्याख्येमधून विवाहित मुलींना वगळणं हे स्पष्टपणे मनमानी, अन्यायकारक आणि घटनाबाह्य असल्याचं न्यायालयानं सांगितलं. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठानं अनुकंपा नियुक्तीच्या उद्देशानं कुटुंबाच्या व्याख्येत विवाहित मुलीचा समावेश होत नाही, असा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा एका प्रकरणातील आदेश रद्द ठरवला.

**घाऊक निर्देशांक**

सरकारने घाऊक किंमत निर्देशांक टप्प्याटप्प्याने बंद करून त्याऐवजी एका सर्वसमावेश उत्पादक किंमत निर्देशांक प्रणालीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. देशातली महागाई आणि किंमत निर्धारणविषयक माहितीची चौकट आधुनिक करण्यासाठी आणि तिला जागतिक स्तरावरील सर्वोत्तम कार्यपद्धतीची सुसंगत करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. वाणिद्य आणि उद्योग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार सरकारने घाऊक किंमत निर्देशांकाचे आधार वर्ष 2011-12 वरुन 2022-23 करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. या निर्देशांकाची सुधारित मालिका प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पुढील पाच वर्षांपर्यंत घाऊक किंमत निर्देशांकासोबत प्रसिद्ध केली जाईल; आणि त्यानंतर हा निर्देशांक पूर्णपणे बंद केला जाईल.

**रुद्रम**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय वायु दलानं स्वदेशी बनावटीच्या रुद्र एम-टू या हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राच्या काल चांदीपूर इथल्या केंद्रावर यशस्वी उड्डाण चाचण्या घेतल्या. क्षेपणास्त्र सोडल्यानंतर, त्यानं लक्ष्याचा अचूकपणे वेध घेतला.

**बोगदा**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यात आंबेसरी गावाजवळ,  तिसऱ्या पर्वतीय बोगद्याचं काम पूर्ण झालं आहे. उच्च-गती रेल्वे विभागात वेगानं होत असलेल्या प्रगतीचं हे एक द्योतक असल्याचं रेल्वे मंत्रालयानं सांगितलं. हा पर्वतीय बोगदा 417 मीटर लांब आणि 14 मीटरपेक्षा जास्त रुंद असून, उच्च-गति बुलेट ट्रेनसाठी पूरक अशा प्रगत देखरेख आणि सुरक्षितता प्रणालींनी तो सुसज्ज करण्यात आला आहे.

**अमली पदार्थ**

दिल्लीत अमली पदार्थ नियंत्रण सहकार्यासंबंधित भारत आणि म्यानमा यांच्या काल आठवी द्विपक्षीय बैठक पार पडली. अमली पदार्थ नियंत्रण ब्युरोचे महासंचालक अनुराग गर्ग यांनी भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व केलं. तर म्यानमाच्या अमली पदार्थ

गैरवापर नियंत्रण केंद्रीय समितीचे सहसचिव थँट ल्विन माउंग यांनी शिष्टमंडळाचं नेतृत्व केलं. या बैठकीदरम्यान उभय देशांनी आपल्या प्रदेशातील बदलत्या अमली पदार्थ तस्करीच्या परिस्थितीचा आढावा घेतला तसंच गुप्तचर माहिती देवाणघेवाण, समन्वित कारवाया, सिंथेटिक अमली पदार्थांचा सामना करणे, डार्कनेट आधारित तस्करी, अफूची अवैध लागवड यासंदर्भातल्या वाढत्या सहकार्यावर चर्चा केल्याचे एनसीबीनं आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>म्यानमा राष्ट्राध्यक्ष-मुंबई</u>**

भारत दौऱ्यावर आलेले म्यानमाचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांनी काल मुंबईतील लोकभवनात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट घेतली. यांनी त्यांचे स्वागत केले. म्यानमा राष्ट्राध्यक्षांच्या सन्मानार्थ लोकभवनात एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>त्रयस्थ मध्यस्थी नेपाळ</u>**

नेपाळचे पंतप्रधान बलेंद्र शाह यांनी सीमाप्रश्नाबाबतीत दीर्घकाळ चाललेल्या वादावर तोडगा काढण्यासाठी चीन आणि ब्रिटनच्या सहभागाची मागणी केल्यानंतर भारतानं नेपाळसोबतच्या सीमा प्रश्नांच्या निराकरणात कोणत्याही त्रयस्थ पक्षांची भूमिका फेटाळून लावली आहे.

सीमा प्रश्नाच्या सर्व पैलूंवर तोडगा काढण्यासाठी दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय यंत्रणा स्थापन केली आहे, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

जम्मू आणि काश्मीरबाबत पाकिस्तान-युरोपियन युनियनच्या संयुक्त निवेदनात केलेले अनावश्यक उल्लेख देखील भारत नाकारतो, असेही जयस्वाल यांनी सांगितलं.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत नेपाळच्या सत्ताधारी राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष रवी लामिछाने आणि त्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. या भेटीत भारत-नेपाळ विकास भागीदारी आणि लोकांमधील संबंधांबाबत चर्चेला भर देण्यात आला, असं डॉ.एस.जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशात सांगितलं. त्यानंतर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नेपाळमधील राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष राबी लामीछाने यांची नवी दिल्लीत भेट घेतली. तसंच नेपाळी शिष्टमंडळासोबत बैठक घेतली. भारत आणि नेपाळमधील विशेष संबंध अधिक दृढ करण्यासाठी एकत्र काम करण्याचा दृढनिश्चय यावेळी उभय पक्षांनी व्यक्त केला.

**<u>पाच न्यायाधीश</u>**

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी काल सर्वोच्च न्यायालयातील पाच नवीन न्यायाधीशांना पदाची शपथ दिली. न्यायमूर्ती शील नागू, न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि न्यायमूर्ती अरुण पल्ली यांच्यासह ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांनी सर्वोच्च न्यायलयाचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. 22 आणि 27 मे रोजी झालेल्या बैठकीमध्ये कॉलेजियमने केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करून केंद्र सरकाने काल ही पदोन्नती देण्यास मंजुरी दिली. केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जून राम मेघवाल यांनी राष्ट्रपतींनी सरन्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतर ही नियुक्ती केल्याचं समाज माध्यमांवरून जाहीर केलेल्या संदेशात म्हटले आहे. या अध्यादेशामुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी मंजूर संख्या 34 वरून 38 झाली आहे.

**<u>अमली पदार्थ</u>**

देशाचे सार्वभौमत्व आणि वैयक्तिक स्वातंत्र्य या दोन गोष्टींमध्ये संघर्ष निर्माण झाला तर राष्ट्रीय सार्वभौमत्वाला अग्रक्रम दिला जाईल, असं सर्वोच्च न्यायालयानं नमूद केलं आहे. विशेषतः अमली पदार्थ आणि मानसोत्तेजक पदार्थांविषयीच्या प्रकरणांमध्ये विशेषत्वाने राष्ट्रीय सार्वभौमत्वाला प्राधान्य दिले जाईल. पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाने दिलेला आदेश रद्द करताना सर्वोच्च न्यायालयानं ही टिपण्णी केली आहे. उच्च न्यायालयाने तुरुंगात राहून मोबाईल फोनच्या साहाय्याने अमली पदार्थाच्या तस्करीचे जाळे चालवल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला जामीन मंजूर केला होता.

**पंचायत-पुरस्कार**

'राष्ट्रीय पंचायत पुरस्कार 2025' वितरण समारंभ आज नवी दिल्लीत आयोजित करण्यात आला आहे. देशभरातील 42 उत्कृष्ट पंचायतींना हे पुरस्कार प्रदान केले जातील. या समारंभादरम्यान, 'दीनदयाल उपाध्याय पंचायत शाश्वत विकास पुरस्कार' श्रेणीअंतर्गत 34 ग्रामपंचायतींना, तर 'नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार' श्रेणीअंतर्गत आठ पंचायतींना पुरस्कार प्रदान करण्यात येतील. पुरस्कार विजेत्या पंचायतींचे प्रमुख आपल्या सर्वोत्तम कार्यपद्धती आणि कामगिरीबाबत सादरीकरणही करतील.

**सीबीएसई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीसाठी सेवांच्या खरेदीशी संबंधित बाबींची चौकशी करण्यासाठी सरकारनं क्षमता विकास आयोगाच्या अध्यक्षा एस. राधा चौहान यांची समिती नेमली आहे. त्या आपला अहवाल एका महिन्याच्या आत सादर करतील. दरम्यान मंडळानं इयत्ता 12वीच्या विद्यार्थ्यांसाठी, उत्तरपत्रिकांच्या स्कॅन केलेल्या प्रतींमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पडताळणी करण्यासाठी आणि उत्तरांच्या पुनर्मूल्यांकनासाठीचं ऑनलाइन पोर्टल खुलं केलं आहे.

**सीबीएसई अध्यक्ष नियुक्ती**

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रशांत लोखंडे यांची केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, मंडळाच्या सचिवपदी वरुण भारद्वाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रसार भारती-वेव्ह ओटीटी**

प्रसार भारतीच्या 'WAVES OTT' या डिजिटल स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मने, नोव्हेंबर 2024 मध्ये सुरू झाल्यापासून अवघ्या दोन वर्षांपेक्षा कमी कालावधीतच, एक कोटी नोंदणीकृत वापरकर्त्यांचा टप्पा ओलांडला आहे. या मंचावर, 140 हून अधिक थेट टीव्ही वाहिन्या, 200 हून अधिक रेडिओ सेवा, थेट कार्यक्रमांचे प्रक्षेपण उपलब्ध करून देण्यात आलं आहे.

**जम्मू-काश्मीर-शोध मोहीम**

जम्मू काश्मीर मधल्या राजौरी जिल्ह्यात, 'ऑपरेशन शेरूवाली'अंतर्गत दहशतवादी शोध मोहीम कालच्या दहाव्या दिवशी देखील सुरू होती. या प्रदेशांतल्या घनदाट जंगलातील दहशतवाद्यांचे छुपे तळ शोधून काढण्यासाठी, लष्कर आणि अन्य सुरक्षा दले संयुक्तपणे ही शोध मोहीम राबवत आहेत.

**महिला टी-ट्वेंटी**

इंग्लंडमध्ये टाँटन इथं झालेल्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत इंग्लंडनं भारतावर 2-1 असा विजय मिळवला. महिला टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धा सुरु होण्यापूर्वी ही मालिका महत्वाची होती. भारतानं हरमनप्रित कौरच्या अर्धशतकी खेळीवर 5 बाद 180 धावसंख्या केली. यजमान संघाची अवस्था 3 बाद 38 केल्यामुळं भारतीय संघाला विजयाची आशा होती परंतु ॲलिस कॅप्सी आणि हेदर नाईट यांच्यातील शतकी भागीदारीनं हा सामना भारताच्या हातून गेला.

भारतीय महिला क्रिकेट संघ T20 विश्वचषक मोहिमेची सुरुवात 14 जूनला एजबॅस्टन इथं पाकिस्तानविरुद्ध करेल.

# या बरोबरच हे ऱाष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.